९६५/८

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

दिनांक = २ सप्टेंबर,१९९७

प्राधिकरणाची पाचवी बैठक दिनांक २८ ऑगस्ट, १९९७ रोजी दुपारी ४.३० वाजता मा.मुख्यमंत्र्याचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त तयार करुन मान्यतेसाठी सादर केले आहे. प्रस्तुत कार्यवृत्त पुढील बैठकीत पक्के होण्याची वाट न पहाता, झालेल्या निर्णयावर मा.अध्यक्षांचे मान्यतेनंतर कार्यवाही सुरु करण्याची परवानगी असावी.

मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव यांना विनंती आहे की, त्यांनी प्रस्तुत बैठकीचे कार्यवृत्तास मा.अध्यक्षांची मान्यताघेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत पाठवावे.

२/९/९७
मुख्य कार्यकारी अधिकारी

(मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,)

विहित नमुन्यामध्ये वाचिकृत कार्य झाल्यावर मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव यांना सूचना करेल.

५/९/९७

~~मुख्य कार्यकारी अधिकारी~~ for compliance pl.

~~खाजगी सचिव~~

१६/९/९७

विहीत नमुन्यात चौथ्या बैठकीपर्यंत इतिवृत्त पाठवावे

मु. मं. स. प्राप्त झाले
दिनांक ३/९/९७

PTO

मा मुख्यमंत्र्यांचे कार्यालयाने मागील पृष्ठावर सुचविल्याप्रमाणे बैठकीच्या इतिवृत्तासोबतच, मागचे बैठकीचे ठरावावर/बाबींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती विहित नमुन्यात मागविली आहे. त्यानुसार चौथ्या (दि-२०/६/९८) व पाचव्या (२८-८-९८) बैठकीत झालेल्या निर्णयांच्या कार्यवाहीचा गोषवारा सोबत मान्यतेसाठी सादर केला आहे. पाचव्या बैठकीच्या इतिवृत्तासोबत तो पाठविण्यात यावा.

✓ पृ १३/प
@ पृ १५/प

[signature]
६-१०-९८

मु का अ
[signature] ६/१०

मा. मुख्य मंत्र्यांचे ~~[illegible]~~ प्रधान सचिव

[illegible] प्रधान [illegible]
[signature] १७/१०

[ मा० मुख्यमंत्री ]

आज दिनांक [illegible]

3258
17/10

सचिव (वित्त/नियोजन)

पाहिले. कार्यवृत्तास मान्यता मिळावी

० डी. पी. राजा
१६/१०/९८

मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव

२०/६/९८ चे कार्यवृत्त आधीच मंजुरीला पाठविण्यात आलेले होते. आता ४ थ्या व ५ व्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यासाठी सादर

[signature]
२२/१०

राजा
२८/१०/९८

[signature]

२९/१०

प्राप्त झाले
०१/१०/९८

[illegible]
२०/१०/९८

DS(K)

CEO (SRA)

२३/११ - मा. मुख्यमंत्री

Secy SRA

सचिव (वित्त/नियोजन)

१९८७८

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

## प्राधिकरणाच्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २८ ऑगस्ट, १९९७ |
| वेळ | : | दुपारी ४.३० वाजता |
| स्थळ | : | मा.मुख्यमंत्र्यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई. |

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. मा. मंत्री, गृहनिर्माण यांनी मा. मंत्री, महसूल यांना प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त करावे अशी सूचना केली. त्यावर प्राधिकरणाच्या सदस्यांची संख्या १६ इतकी ठरवून दिल्याचे स्पष्ट करण्यात आल्यावर महसूल मंत्री यांना विशेष निमंत्रित म्हणून प्राधिकरणाच्या बैठकांना बोलवावे असे आदेश अध्यक्षांनी दिले. त्यानंतर अध्यक्षांच्या सुचनेनुसार श्री.गौतम चॅटर्जी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीसाठी सादर केलेल्या विषय सुचीतील बाबींची थोडक्यात माहिती कथन केली. त्यानुसार झालेली चर्चा व निर्णय खालीलप्रमाणे आहेत :-

बाब क्रमांक - ५/१ :- मागील बैठकीचे इतिवृत्त :-

प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त पक्के करण्यासाठी बैठकीस सादर करण्यात आले होते. त्यावर कोणास कांही सुचवावयाचे आहे काय, अशी पृच्छा अध्यक्षांनी केली. तथापि सदस्यांकडून इतिवृत्तास सूचना अथवा बदल न प्रस्तावित केल्याने चौथ्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.

ठराव क्र.५/१/१ : प्राधिकरणाच्या दिनांक २० जून, १९९७ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक - ५/२ : प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीनंतर केलेल्या कामाचा गोषवारा

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौथ्या बैठकीनंतर प्राधिकरणाने केलेल्या कामांचा गोषवारा सादर करतांना खालील ठळक बाबींचा उल्लेख केला. प्राधिकरणाकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रस्तावांना मंजूरी एकंदर चार टप्प्यात देण्यात येत होती. तथापि योजना लवकर मंजूर व्हाव्यात यादृष्टीने हया चार टप्प्याऐवजी इरादा पत्र व अभिन्यास मंजूरी आणि बांधकाम नकाशे व बाधंकाम चालू करण्यापर्यंतच्या परवानगीचा एकच टप्पा करण्यात आला. तसेच मंजूरी पत्राच्या पूर्वी असलेल्या १ वर्षाच्या विधीग्राह्यतेचा कालावधी कमी करुन तो ३ महिन्यांचा करण्यात आल्याचे सांगितले. यापुढे परिशिष्ट-२ संबंधित जमीनमालक यंत्रणांकडून प्रमाणित करुन घेण्याची कार्यवाही प्राधिकरण करील. विकास नियंत्रण नियमावली प्रसिध्द करण्यासाठी नगर विकास विभागास सादर केली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतर्गत सहकारी संस्थाची नोंदणी व अनुषंगीक कामासाठी प्राधिकरणाच्या कार्यालयात एक स्वतंत्र कैक्ष चालू करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी आवश्यक त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या लवकर करण्याची विनंती सहकार विभागास करण्यात आली आहे. झोपडपट्टी योजनांतर्गत जमीनीची मोजणी व सीमांकन करणे, मंजूर झालेल्या योजनेच्या नकाशाप्रमाणे मालमत्ता कार्डामध्ये दुरुस्ती करणे,जमीनीचे विकास हक्क विकासकास देणे, योजनांतर्गत दोन घटकानुसार विभागणी करुन जमीनीचा स्वतंत्र भाडेपट्टा देणे, इत्यादी बाबतीत लागणारी सर्व कागदपत्रे, मोजणी नकाशा, वापरलेले चटईक्षेत्र इत्यादी माहिती एकत्रित करुन प्राधिकरण संबंधित शासकीय /निमशासकीय यंत्रणेकडे अर्ज करील व त्याचा पाठपूरावा करुन जमीनमालक यंत्रणांकडून भाडेपट्टा मिळवून देईल. या व्यतिरिक्त दस्तऐवजाचे नमुने तयार करणे,

दस्तऐवजाची नोंदणी करणे, मुद्रांक शुल्कातून सूट मिळविणे, न्यायालयीन कामकाजासाठी वकील (रिटेनर) नेमणे इत्यादी बाबींचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी थोडक्यात उल्लेख केला.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूरीची गती वाढविण्यासाठी प्राधिकरणाने केलेल्या बदलाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधलेल्या गाळयांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याचा प्रस्ताव महापालिकेने शासनास सादर केला असल्याचे मु.का.अ. यांनी सांगितले. त्यावर मा.अध्यक्षांनी असे सूचित केले की, या प्रस्तावाला नगर विकास विभागाने मंजूरी देण्याच्यादृष्टीने कार्यवाही करावी. त्यावेळी अशाप्रकारची सवलत मुंबई शहरातील पुनर्रचित इमारतीसाठीसुध्दा लागू करणे इष्ट होईल.

बाब क्रमांक-५/३ : संक्रमण शिबीरे

संक्रमण शिबीरासंदर्भात चालू असलेल्या कार्यवाहीची माहिती मु.का.अ. यांनी दिली. चर्चेमध्ये असे मत मांडण्यात आले की, सद्या सादर होणाऱ्या योजनांची संख्या पहाता आवश्यक असणाऱ्या संक्रमण गाळयांची संख्या विचारात घेऊन कायम स्वरुपी संक्रमण शिबीराची उभारणी करावी. त्या अनुषंगाने संक्रमण गाळयांच्या बांधकामाचे नियोजन करावे. तसेच जर खाजगी जमीनमालक त्यांच्या जमीनीवर संक्रमण शिबीर बांधण्यासाठी पुढे आले तर त्यांनाही प्रोत्साहन व परवानगी देण्यात यावी. चर्चेत भाग घेऊन मा.अध्यक्षांनी म्हाडास असे आदेश दिले की, म्हाडाने ज्या १४ ठिकाणी संक्रमण गाळे बांधण्याचे प्रस्तावीत केले आहे, ते सर्व प्रस्ताव एकत्रित करुन जेथे विक्रीची किंमत जास्त मिळणार असेल तेथे विक्रीच्या घटकाचे जास्त बांधकाम करावे जेणेकरुन संक्रमण गाळे बांधण्याचा प्रस्ताव किफायतशीर होईल व त्यासाठी करण्यात आलेली गुंतवणूक म्हाडाला परत मिळू शकेल. त्याचप्रमाणे संक्रमण गाळे बांधतांना शक्य तो लिफटचा वापर करावा लागू नये असा दृष्टीकोन ठेवून इमारती बांधाव्यात. तसेच चर्चेमध्ये असेही ठरले

की, जर उपलब्ध असलेल्या भूखंडावर संक्रमण गाळे बांधूनही जर आवश्यकता भासली तरच ना विकास क्षेत्रावर कायम स्वरुपी संक्रमण गाळे बांधण्याचा विचार करावा.

ठराव ५/३/२ : संक्रमण शिबीर बांधताना शक्यतो लिफ्टची आवश्यकता टाळून ती सहा महिन्यांच्या आत बांधून पूर्ण व्हावीत. जर खाजगी मालकांनी त्यांच्या जमीनीवर संक्रमण शिबीरे बांधण्याचा प्रस्ताव सादर केला तर त्यास मंजूरी द्यावी. तसेच म्हाडाने निवडलेल्या १४ भूखंडावर संक्रमण शिबीरे बांधण्याचे काम ताबडतोब सुरु करावे आणि नंतरही गरज भासली तर ना विकास क्षेत्रातील जमीनीवर कायम स्वरुपी संक्रमण शिबीर बांधण्याचा प्रस्ताव सादर करावा.

बाब क्रमांक-५/४ : वार्षिक अहवालास मंजूरी

प्राधिकरणाने गेल्या वर्षभरात केलेली कार्यवाही दर्शविणारा अहवाल मंजूरीसाठी बैठकीत सादर करण्यात आला होता. तो मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक-५/४/३ : प्राधिकरणाचा १९९६-९७ चा वार्षिक अहवाल मंजूर केला.

बाब क्रमांक-५/५ : सागरी किनाऱ्यापासून ५०० मीटर अंतरावरील झोपडपट्टीचे पुनर्वसन

झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्यादृष्टीने सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यामध्ये केंद्र शासनाकडून कांही मुद्यांवर खुलासा मिळविणे आवश्यक असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यासाठी आवश्यक ती माहिती केंद्र शासनाकडे पाठविण्याकरिता राज्य शासनास सादर केली असल्याचेही त्यांनी सांगितले. चर्चेमध्ये भाग घेतांना मा.मंत्री, गृहनिर्माण यांनी असे सांगितले की, ह्या बाबतीत केंद्र शासनाच्या परवानगीची कितपत आवश्यकता आहे ते तपासण्याची गरज आहे. त्यावर मा.अध्यक्षांनी असे आदेश दिले की, या विषयावर नगर विकास विभागाने पुढाकार घेऊन एक बैठक आयोजित करावी व त्वरीत निर्णय होईल असे पहावे.

बाब क्रमांक-५/६ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये मुंबई शहर विकास योजनेमध्ये किरकोळ दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव

अ) घाटकोपर येथील विजय हेमावाडी ही योजना राबवित असतांना नियोजित विकास आराखड्यामधील रस्त्याचे आरक्षण रद्द केल्यास योजना चांगल्याप्रकारे राबविता येईल असे मु.का. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यावर प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात आली. तथापि विकास आराखड्यात अंतिम बदल करण्यापूर्वी प्राधिकरणाची व शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

ब) वरीलप्रमाणे आणखी कांही फेरबदल करण्याची आवश्यकता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास भासली तर अशा प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी घेण्या अगोदर त्यास उक्त अधिनियमान्वये त्यावर लोकांच्या हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही करण्यासाठी मु.का.अ. यांना प्राधिकृत करण्याचा ठराव बैठकीत ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन ठराव मंजूर झाला.

<u>ठराव क्रमांक-५/६/४</u> : झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवितांना मंजूर विकास योजनेत काही दुरुस्ती करण्याची मु.का.अ. यांना आवश्यकता भासल्यास तशा प्रकारच्या प्रस्तावावर लोकांकडून हरकती व सूचना मागविण्याची कलम ३७(१)ब खाली करावयाची कार्यवाही करण्यासाठी मु.का.अ. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

बाब क्रमांक-५/७ : पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकासकाच्या पात्रतेचे किमान निकष

प्राधिकरणाकडून सद्या मंजूरी देण्यात येत असलेल्या योजनांशी संबंधित विकासकांची पात्रता किंवा आर्थिक कुवत तपासण्याची कोणतीही तरतूद वा निकष विहित करण्यात आलेले नाहीत. आजपर्यंत सुमारे ३०० योजना मंजूर करण्यात आल्या असल्यातरी त्या प्रमाणात

सदनिकांचे प्रत्यक्ष बांधकाम चालू झालेले नाही. ह्या बाबींचा विचार करतांना सदर संबंधित विकासकांची आर्थिक कुवत नसावी अशी शंका घेण्यास वाव आहे असे मु.का.अ. यांनी प्रतिपादन केले. करिता यापुढे योजना स्वीकारतांना संबंधित विकासकांनी त्यांची आर्थिक कुवत व पात्रता दर्शविणारे आवश्यक ते कागदपत्र सादर केल्याशिवाय योजना स्विकारली जाणार नाही, असा प्रस्ताव विचारार्थ सादर केल्याचे सांगितले. ह्या बाबीवर बैठकीमध्ये चर्चा झाली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आले :-

ठराव क्रमांक-५/७/५ :-

अ) विकासक जर एखादी कंपनी/अथवा भागिदारी फर्म/मालकी फर्म असेल तर कंपनी स्थापनेबाबतचा मेमोरंडम ऑफ असोसिएशन, भागिदारी करारपत्र इत्यादी जे लागू असेल त्याची प्रत व कंपनीच्या संचालकांची नांवे.

ब) विकासक फर्मचे गेल्या तीन वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद, तसेच नफा-तोटा पत्रक.

क) चालू व लगतच्या एकंदर तीन वर्षाची आयकराची प्रमाणपत्रे.

ड) योजनेच्या खर्चाच्या रकमेपैकी २०% रकमेची विकासकाने केलेली व्यवस्था व उर्वरीत ८०% रक्कम उभी करण्यासाठी विकासक आखू शकेल वा आखली असेल अशी आर्थिक योजना.

वरीलप्रमाणे कागदपत्र सादर केल्यावरच विकासकांची योजना स्विकारण्यात येईल व मंजूर करण्यात येईल. हा निर्णय नव्याने सादर होणाऱ्या योजनांना लागू राहील व त्याचबरोबर ज्या जून्या योजनांमध्ये मंजूरी पत्राच्या वैधतेची मुदत संपलेली आहे व त्याचे नुतनीकरण करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विकासकांच्या बाबतीतही लागू राहील.

७ ९६३।८

दिनांक २८ ऑगस्ट, १९९७ रोजीच्या प्राधिकरणाच्या बैठकीस
उपस्थित राहिलेल्या सन्माननीय सदस्य व विशेष निमंत्रितांची यादी.

| नांव | पदनाम |
|---|---|
| १) मा. श्री.मनोहर जोशी, मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २) मा.श्री. सुरेशदादा जैन, गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| ३) मा.श्री.नारायण राणे, महसूल मंत्री | विशेष निमंत्रित |
| ४) मा.श्री.दिनेश अफझुलपूरकर, मुख्य सचिव | सदस्य |
| ५) श्री.अजित वर्टी, प्रधान सचिव, महसूल | सदस्य |
| ६) श्री.के.नलिनाक्षण, प्रधान सचिव, नगर विकास | सदस्य |
| ७) श्री.व्ही.पी.राजा, सचिव, गृहनिर्माण | सदस्य |
| ८) श्री.किरिट सोमैय्या, आमदार | सदस्य |
| ९) श्री.शशी प्रभू, वास्तुविशारद | सदस्य |
| १०) श्री.शिरिष पटेल, वास्तुविशारद | सदस्य |
| ११) श्री.विलास अवचट, अध्यक्ष, म्हाडा | विशेष निमंत्रित |
| १२) श्री.रविंद्र वायकर, सभापती, झो.सु.मंडळ, मुंबई | विशेष निमंत्रित |
| १३) श्री.एस.एस.क्षत्रिय, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा | विशेष निमंत्रित |
| १४) श्री.गौतम चॅटर्जी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण | सदस्य |
| १५) श्री.वा.ग.गोरडे, सचिव, प्राधिकरण | |

दिनाक :- १.१०.९७

**दिनांक २०.६.९७ रोजी झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीचे कार्यवृत्त**

| अ.क्र | बाब क्र. | सभेत झालेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ठरविलेली जबाबदारी | अंमलबजावणीसाठी ठरविण्यात आलेली कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | ४/१ | ठराव क्र.४/१/१ अन्वये झो.पु.प्रा.ची दि.१३.९.९६ रोजी झालेल्या तिस-या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे दि.३०.१.९७ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करण्यात आले व सर्व पत्रव्यवहार व इतिवृत्त मराठीतून करण्याच्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सर्व इतिवृत्ते मराठीतून करण्यात येत आहेत. |
| २. | ४/३<br>४/४ | प्राधिकरणाच्या बचत खात्यातून रकमा काढण्यासाठी श्री.जोशी, उप संचालक नगर रचना व श्री.खाबडे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्याचप्रमाणे विविध ठेवी छाननी शुल्क, विकास शुल्क इ.पोटी जमा होणा-या रकमा प्राधिकरणाच्या निधीत जमा करण्यासाठी श्री.होळीकर व श्री.तांबे, कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत केले होते. या दोन्ही प्रस्तावांना अनुक्रमे ४/३/२ व ४/४/३ च्या ठरावान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली. | झो.पु.प्रा. | कार्योत्तर मंजूरी मिळाली. |
| ३. | ४/५ | प्राधिकरणात रूजू झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांच्या नियुक्तीची प्राधिकरणाने नोंद घेतली. | झो.पु.प्रा. | कालमर्यादेचा प्रश्न नाही. |
| ४. | ४/६ | प्राधिकरणात बृहन्मुंबई महानगरपालिका त्याचप्रमाणे शासकीय कार्यालयातून प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या १०% (कमाल मर्यादा न ठेवता) प्रतिनियुक्ती भत्ता देण्याचे ठरले.(ठराव क्र.४/६/४) | झो.पु.प्रा. | याबाबत प्राधिकरणाने क्र.झोपुप्रा/प्रतिनियुक्ती भत्ता / प्र.क्र.१४९ / ९६ / प्रशा, दि.१२ ऑगस्ट ९७ अन्वये आदेश निर्गमित केले असून कार्यवाही सुरू झालीआहे. |
| ५. | ४/७ | प्राधिकरणाच्या सेवेत प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्यासाठी ठराव क्र.४/७/५ अन्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामध्ये जी पध्दती अवंलबिण्यात येते ती अंवलबिण्यांत यावी असे ठरविण्यात आले. | झो.पु.प्रा. | यासंबंधी प्राधिकरणाने क्र.झोपुप्रा /वैद्यकीय भत्ता / प्र.क्र.२६७ / ९७ / प्रशा, दि.१६.७.९७ अन्वये आदेश निर्गमित केलेअसून त्यानुसार त्यांना खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येत आहे. |

९६/८

## दिनांक २८.८.९७ रोजी झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीचे कार्यवृत्त

| अ. क्र | बाब क्र. | सभेत झालेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ठरविलेली जबाबदारी | अंमलबजावणीसाठी ठरविण्यात आलेली कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | | मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी मा.मंत्री (महसूल) यांना प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यासंबंधी केलेल्या सूचनेस प्राधिकरणाच्या सदस्यांची संख्या १६ इतकी ठरवून दिल्याचे स्पष्ट करण्यांत आल्यावर मा.मंत्री (महसूल) यांना विशेष निमंत्रित म्हणून बोलवावे असे आदेश मा.अध्यक्षांनी दिले. | गृहनिर्माण विभाग | यासंबंधी गृहनिर्माण विभागाकडे कार्यवाहीची विनंती करण्यात येत आहे. |
| २. | ५/१ | दि.२०.६.९७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीचे कार्यवृत्त ठराव क्र.५/१/१ अन्वये कायम करण्यात आले. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | मंजूर इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना/निमंत्रितांना पाठविण्यात आल्या आहेत. |
| ३. | ५/२ | प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीनंतर केलेल्या कामातील ठळक बाबींचा उल्लेख करण्यात आला.<br>अ) झो.पु.योजना लवकर मंजूर होण्यासाठी इरादा पत्र, अभिन्यास मंजूरी, बांधकाम नकाशे हया तीन टप्प्यांऐवजी एकच टप्पा करण्यांत आला.<br>ब) परिशिष्ट - २ संबंधित जमीनमालक यंत्रणाकडून प्रमाणित करून घेण्याची कार्यवाही प्राधिकरण करील.<br>क) झो.पु.योजनांतर्गत सहकारी संस्थांची नोंदणी व अनुषंगिक कामासाठी स्वतंत्र कक्ष करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला.<br>ड) झो.पु.योजनांतर्गत झोपडपट्टीवासियांना वाटप करावयाच्या व खुल्या विक्रीतील सदनिका या दोन घटकानुसार विभागणी करून जमिनीचा स्वतंत्र भाडेपट्टा देणे इत्यादी बाबतीत लागणारी सर्व कागदपत्रे, मोजणी नकाशा, वापरलेले चटईक्षेत्र याची माहिती एकत्रित करून संबंधित शासकीय/निमशासकीय यंत्रणेकडे अर्ज करून जमिन मालक यंत्रणाकडून भाडेपट्टा प्राधिकरण मिळवून देईल. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण<br>सहकार विभाग<br>झो.पु.प्रा. | कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.<br>सहकार विभाग शासन आदेश क्र.राजस-१०९७ / १३६५ / प्र.क्र.११२/१२-स, दि.२७.८.९७ अन्वये प्राधिकरणात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व कर्मचारी वर्गाची नियुक्ती केली असून सहकारी संस्थांचे नोंदणीचे कामे प्राधिकरणात करण्यास सुरूवात झाली आहे.<br>यासंबंधीचा भाडेपट्टयाचा मसुदा तयार करण्यात आला असून प्राधिकरणाचे पत्र क्र.झोपुप्रा/सचिव/११०२,दि.१९.९.९७ अन्वये गृहनिर्माण विभाग, महसूल विभाग, महापालिका व म्हाडा कडे पाठविण्यात आला आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | इ) दस्तऐवजाचे नमुने तयार करणे, दस्तऐवजा[illegible] [illegible]णी, मुद्रांक शुल्कातून सूट मिळविणे, न्यायालयीन कामासाठी वकील (रिटेनर) [illegible]णे इत्यादी बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उल्लेख केला. | झो.पु.प्रा. | प्राधिकरणाने क्र. झोपुप्रा / नियुक्ती / प्र.क्र.२६४/ ९७ / प्रशा, दि. २७.८.९७ अन्वये लिगल रिटेनरची नियुक्ती केली आहे. |
| ४ | ५/३ | संक्रमण शिबिर बांधताना शक्य तो लिफ्टची आवश्यकता टाळून ती सहा महिन्यांच आत पूर्ण करावीत. खाजगी मालकांनी संक्रमण शिबिरे बांधण्याचा प्रस्ताव सादर केल्यास ती मंजूर करावीत. म्हाडाने निवडलेल्या १४ भूखंडावर संक्रमण शिबिरे बांधण्याचे काम त्वरित सुरू करावे व गरज असल्यास ना विकास क्षेत्रातील जमिनीवर कायम स्वरूपी संक्रमण शिबिर बांधण्याचा प्रस्ताव सादर करावा असे ठराव क्र. ५/३/२ अन्वये ठरले. | गृहनिर्माण व क्षेत्रविकास, प्राधिकरण व महापालिका | ह्या इतिवृत्ताचे मंजूरीनंतर हा ठराव कार्यवाहीसाठी म्हाडा व महापालिका यांचेकडे पाठविण्यात येईल. |
| .. | ५/४ | प्राधिकरणाने वर्षभरात केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल ठराव क्र.५/४/३ अन्वये मंजूर केला. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | कालमर्यादेचा प्रश्न उदभवत नाही. सदर अहवालाच्या प्रती मुद्रीत करून पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविण्यात येतील. |
| . | ५/५ | सागरी किना-यापासून ५०० मीटर अंतरावरील झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासंबंधी नगर विकास विभागाने पुढाकार घेऊन एक बैठक आयोजित करावी व त्वरित निर्णय होईल असे पहावे. | नगर विकास विभाग | नगर विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी विनंती करण्यात आली आहे. |
| . | ५/६ | झो.पु.योजनेसाठी आवश्यकतेनुसार मंजूर विकास योजनेत दुरूस्ती करावयाची झाल्यास कलम ३७(१) ब नुसार तत्संबंधी प्रस्तावावर हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही करण्यासाठी ठराव क्र. ५/६/४ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. |
| . | ५/७ | विकासकाची आर्थिक कुवत तपासण्यासाठी त्याच्या फर्मचे मागील तीन वर्षाचे नफा-तोटा पत्रक (लेखा परिक्षित) आयकर प्रमाणपत्रे आणि या योजनेसाठी २०% साठी केलेल्या व्यवस्था ब ८०% साठी आखलेली योजना यासंबंधीची कागदपत्रे त्याने सादर केल्यावरच त्याची योजना स्विकारण्यात येईल व मंजूर करण्यात येईल. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| प्राधिकरणाच्या बैठकीसाठी उपस्थित रहाण्यासाठी अशासकीय सदस्य व निमंत्रित यांना वित्त विभागाच्या निर्णयानुसार रू.१५०/- इतका बैठक भत्ता अथवा शासन/प्राधिकरण यांनी वाहन उपलब्ध करून न दिल्यास रू.२५०/- इतका प्रवास खर्च देण्यात मंजूरी दिली. (ठराव क्र.४/८/६) | झो.पु.प्रा. | याबाबतची आवश्यक कार्यवाही पुढील बैठकीपूर्वी करण्यात येईल. |
| झो.पु.प्रा.अंतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावासोबत लाभार्थीची पात्रता, झोपडयांची संख्या, भूखंडाचे क्षेत्रफळ इ.बाबत विविध यंत्रणांकडून उपलब्ध होणा-या माहितीमध्ये एक वाक्यता येण्यासाठी प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा व अतिरिक्त जिल्हाधिकारी(अतिक्रमणे)यासाठी एक समान नमुना (परिशिष्ट दोन) तयार केला त्याची प्राधिकरणाने नोंद घेतली. | झो.पु.प्रा. | कालमर्यादेचा प्रश्न नाही. कार्यवाही करण्यात आली आहे. |
| झो.पु.प्राधिकरणाची व्याप्ती वाढविण्यासाठी सर्व सामान्य नागरिक अथवा शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांच्या संस्थांना झो.पु.यो.अंतर्गतचे भूखंड गृहनिर्माणासाठी उपलब्ध करून सहकारी संस्थांनी विकासकाची भूमिका पार पाडून प्राधिकरणाने संबंधितांचा त्याचप्रमाणे हुडकोसारख्या वित्तीय संस्थांच्या सहभागासाठी प्राधिकरणाने प्रयत्न करावेत. | झो.पु.प्रा. | यासाठी कालमर्यादा निश्चित केलेली नाही. |
| समुद्र किना-यालगत वसलेल्या मुंबई व उपनगरातील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करताना सागरी क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलींच्या तरतूदी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत नगर विकास विभागाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा असे ठरले. | झो.पु.प्रा. | त्वरीत नगर विकास विभागाकडे पाठपुरावा करण्यांत आला आहे. |
| पुनर्वसन गाळयापोटी भरावयाची ठेव(रू.२०,०००)व विकासखर्च (रू.८४०/-प्रती चौ.मी.) करण्यासाठी संस्थांना/विकासकांना सुलभ हप्त्यांनी भरावयाची सवलत देण्याचे ठरविण्यात आले. | झो.पु.प्रा. | हया ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. |
| झो.पु.योजनेसाठी अपेक्षित गती न येण्याचे संक्रमण शिबिर गाळयांची अनुपलब्धता हे प्रमुख कारण असल्याने एकाचवेळी किमान तीन ठिकाणी संक्रमण शिबिर गाळयांची योजना हाती घेण्यासंबंधी कार्यवाही सुरू करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या. त्याचप्रमाणे राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडून उपलब्ध होणारे गाळे उपलब्ध करून देण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. | महसूल विभाग, म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका. | संक्रमण गाळयांची योजना हाती घेण्याबाबत प्राधिकरणाने महसूल विभाग, म्हाडा व बृहन्मुंबई महानगर पालिका यांना दिनांक २७.६.९७ रोजी कळविले आहे. |
| झो.पु.योजनांतर्गत प्राधिकरणाकडे जमा होणारी ठेव प्राधिकरणातच जमा करून सध्या झोपडपट्टीवासियांच्या सहकारी संस्थांना हस्तांतरित करण्यात येऊ नयेअसे ठराव क्र.४/१४/९ अन्वये ठरले. | झो.पु.प्रा. | कालमर्यादा नाही. कार्यवाहीसाठी नोंद घेतली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | ४/१५ | झो.पु.योजनांतर्गत पात्र लाभार्थींना मोफत वाटप करावयाच्या सदनिकांवर मुद्रांक शुल्क अधिनियमांतर्गत कोणतेही मुद्रांक शुल्क आकारू नये असे ठरले.(ठराव क्र ४/१५/१९) त्याचप्रमाणे खुल्या विक्रीसाठी बांधावयाच्या क्षेत्रफळाच्या बाबतीत मुद्रांक शुल्क आकारणीसाठी प्रकल्प खर्च गृहीत धरून प्रचलित नियमाप्रमाणे किंमत व देय मुद्रांक शुल्क आकारावे असेही ठरले. | महसूल विभाग | कालावधी निश्चित नाही याबाबत प्राधिकरणाने दि.१४.८.९७ च्या पत्र क्र.झोपुप्रा / मुद्रांक / प्र.क्र.६४ /प्राधि-१/९५८ अन्वये प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठविला आहे. शासन निर्णय अपेक्षित आहे. |
| १४. | - | बाब टिप्पण्यांवरील चर्चे व्यतिरिक्त इतर विषयांवरही झालेल्या चर्चेत मा.अध्यक्ष यांनी असे सांगितले की, महापालिकेच्या प्रत्येक विभागाने झोपडपट्टीवासियांच्या किती सहकारी संस्थांनी विकासकाबरोबर करार केले व किती बाकी आहेत याचा तपशील सादर करण्यास महापालिकेस सांगितले. | बृहन्मुंबई महानगरपालिका | याबाबत प्राधिकरणाने दि.२७.६.९७ च्या पत्र क्र. झोपुप्रा / अजि / प्र.क्र.७०० / ९७ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून माहिती मागविली आहे. |
| १५. | - | झोपडपट्टीवासियांचा या योजनेसाठी सहभाग वाढण्यासाठी राजीव गांधी निवारा प्रकल्पातील समाज विकास अधिका-यांचा उपयोग करून घेण्याबाबत गृहनिर्माण मंत्री यांनी सांगितले. | राजीव गांधी निवारा प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | याबाबत राजीव गांधी निवारा प्रकल्पातील चार समाज विकास अधिका-यांनी दि.१३.८.९७ पासून सुरूवात योजनाना भेटी देवून अडचणी समजून घेण्यास सुरूवात केली आहे. |